महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी
स्थापन करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राकायो-२०१८/प्र.क्र.१४५/राकावि-२

गोकूळदास तेपजाल रुग्णालय आवार, संकूल इमारत,१० वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०५ मे, २०१८.

**वाचा -**

1) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.राकायो-२०१४/प्र.क्र.३३३/१४/राकावि-२, दिनांक २१.०६.२०१६.**
2) **आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचे पत्र क्रमांक आयुक्त/राकावियो/ का.क्र.९/३४१९/२०१८, दिनांक ०७.०३.२०१८.**
3) **आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचे पत्र क्रमांक आयुक्त/राकावियो/का.क्र.९/४९७३/२०१८, दिनांक ०५.०४.२०१८.**

**प्रस्तावना -**

केंद्र शासनाने सन २०१० मध्ये राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ मध्ये सुधारणा केली असून त्यातील कलम ५८(५) नुसार राज्यकरीता राज्यस्तरीय राज्य कामगार विमा महामंडळ स्थापन करण्याची तरतूद विहित केलेली आहे. या तरतूदीच्या अनुषंगाने स्वतंत्र राज्यस्तरीय महामंडळाची स्थापना दिनांक २१.०६.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली होती. तथापि, राज्य कामगार विमा महामंडळाच्या दिनांक ०६.१२.२०१७ व दिनांक १६.०२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या १७२ व १७३ क्रमांकाच्या बैठकीमध्ये राज्य कामगार विमा योजेकरीता सोसायटी स्थापन करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सोसायटी स्थापन झाल्यास राज्य कामगार विमा महामंडळाकडून येणारी रक्कम थेट सोसायटीत जमा होईल आणि महत्वाचे निर्णय जलदगतीने घेण्यात येऊन विमा लाभार्थ्यांना वैद्यकीय सुविधा अधिक सुलभतेने व परिणामकारकरित्या पुरविता येतील. त्यामुळे राज्यस्तरीय राज्य कामगार विमा महामंडळाची स्थापना रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक राकायो-२०१४/प्र.क्र.३३३/१४/राकावि-२, दिनांक २१.०६.२०१६ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून राज्य कामगार विमा योजनेकरीता महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीच्या नियामक मंडळ व कार्यकारी समिती यांची संरचना खालील प्रमाणे राहील. त्यांचे कार्य व शक्ती परिशिष्ट “अ” व “ब” मध्ये जोडण्यात आले आहे.

नियामक मंडळ (Governing Body)

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र शासन |
| उपाध्यक्ष | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र शासन |
| सदस्य | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन |
| | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन |
| | राज्य कामगार विमा महामंडळ प्रतिनिधी |
| | नियोक्ता प्रतिनिधी (३) |
| | कामगार प्रतिनिधी (३) |
| | अप्पर आयुक्त, राज्य कामगार विमा महामंडळ, महाराष्ट्र |
| | राज्य वैद्यकीय अधिकारी, राज्य कामगार विमा महामंडळ, महाराष्ट्र |
| मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव | आयुक्त, राज्य कामगार विमा योजना |

कार्यकारी समिती (Executive Committee)

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन |
| उपाध्यक्ष | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र शासन |
| सदस्य | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन |
| | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन |
| | आयुक्त, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन |
| | नियोक्ता प्रतिनिधी (१)-नियामक मंडळाचे नियोक्ता प्रतिनिधी सदस्यांमधुन नियामक मंडळाने नामनिर्देशीत केलेले |
| | कामगार प्रतिनिधी (१)-नियामक मंडळाचे नियोक्ता प्रतिनिधी सदस्यांमधुन नियामक मंडळाने नामनिर्देशीत केलेले |
| | अप्पर आयुक्त, राज्य कामगार विमा महामंडळ, महाराष्ट्र |
| | राज्य वैद्यकीय अधिकारी, राज्य कामगार विमा महामंडळ, महाराष्ट्र |
| मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव | संचालक (वैद्यकीय), राज्य कामगार विमा योजना, मुंबई |

२) सदर सोसायटीचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात यावे. त्यावर आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांच्या नियंत्रण असेल.

३) सदर सोसायटीचा जमा खर्च व ताळेबंद यांचे लेखापरिक्षण महालेखापाल यांच्याकडून करुन घेण्यात यावे.

४) सद्य:स्थितीत राज्य कामगार विमा योजनेत कार्यरत असलेले राज्य शासनाचे कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवा शर्ती संरक्षित राहतील तसेच सदर कर्मचाऱ्यांना राज्य शासनाचे सेवाविषयक "महाराष्ट्र नागरी सेवा नियम" लागू राहणार असून महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीचे कर्मचारी आयुक्त, राज्य कामगार विमा योजना महाराष्ट्र यांच्या प्रशासकीय नियंत्रण व पर्यवेक्षणाखाली राहतील. तसेच सोसायटी स्थापित झाल्यास राज्य शासनाचे कर्मचारी सोसायटीच्या आस्थापनेवर Deemed Deputation कार्यरत राहतील याबाबतचा निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने स्वतंत्रपणे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०५११५१३०४३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2018.05.05 12:17:40 +05'30'

**संजय मोरे**
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मुंबई.

४. मंत्री, कामगार यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई.
१२.महासंचालक, राज्य कामगार विमा महामंडळ,पंचदिप भवन, सी.आई.जी.मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
१३.संचालक (वैद्यकीय), राज्य कामगार विमा योजना, मुंबई.
१४.निवड नस्ती (राकावि-२).

परिशिष्ट "अ" : नियामक मंडळाची कार्ये व शक्ती

## नियामक मंडळाची कार्ये व शक्ती (Functions & Powers of Governing Body)

### १.कार्ये :-

१. अध्यक्षांनी ठिकाण व वेळ निश्चित केल्यानुसार ०६ महिन्यात किमान एकदा नियामक मंडळाची बैठक घेण्यात येईल. नियामक मंडळाच्या १/३ सदस्यांकडून अध्यक्षांना विनंती प्राप्त झाल्यास, अध्यक्षांकडून शक्य तेवढ्या शिघ्रतेने व शक्य त्या ठिकाणी नियामक मंडळाची बैठक बोलाविण्यात येईल.

२. मांडण्यात आलेल्या कार्यसुचीवर विचार विनिमय / मान्यता देण्याकरीता दरवर्षी १० डिसेंबर व १० जून पूर्वी नियामक मंडळाची बैठक घेण्यात येईल.

- ३१ मार्च ला संपणाऱ्या वर्षाकरीता ३१ मे पूर्वी वित्तीय विवरणपत्र (जमा व अदान लेखा, प्राप्ती व खर्च लेखा आणि ताळेबंद पत्र) तयार करण्यात येऊन १० जून पूर्वी नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करणे. मान्य करण्यात आलेले लेखा नियंत्रक महालेखापरिक्षक (C&AG) यांच्याकडे नामिका प्रविष्ट असलेल्या सनदी लेखापाल (CA) यांना लेखापरिक्षाकरीता पाठविण्यात येईल.
- परीक्षित लेखा लेखापरिक्षा अहवालासह १० डिसेंबर पूर्वी घेण्यात येणाऱ्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.
- १० डिसेंबर पूर्वी घेण्यात येणाऱ्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये चालू व पुढील वर्षाकरीता अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक व वार्षिक कृती आराखडा सादर करण्यात येईल
- अध्यक्षांच्या मान्यतेने इतर कार्यसुची

प्राप्ती व खर्च लेखा आणि अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकासह बैठकीचे मान्यताप्राप्त इतिवृत्त राज्य कामगार विमा महामंडळास विहीत तारखेस सादर करण्यात येईल.

३. नियामक मंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये खालील बाबी मांडण्यात येऊन निकाली काढण्यात येईल.

- सोसायटीचे वार्षिक वास्तविक व वित्तीय प्रगती अहवाल
- मागील वर्षाचे प्राप्ती व खर्च लेखा आणि ताळेबंद पत्र
- पुढील वर्षाचा वार्षिक कृती आराखडा
- पुढील वर्षाचे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक
- धोरणे आणि प्रकल्प आढावा, टिप्पणी व शिफारसी असल्यास,
- कार्यकारी समिती व इतर समित्यांची नियुक्ती
- अध्यक्षांच्या मान्यतेने इतर बाबी

४. नियामक मंडळाच्या बैठकीचे सुचनापत्रामध्ये बैठक आयोजित केल्याचा दिनांक, वेळ व ठिकाण या बाबी नमूद करून बैठकीचे सुचनापत्र बैठकीच्या दिनांकाच्या १० कामांच्या दिवसांपूर्वी नियामक मंडळाच्या प्रत्येक सदस्यांना देण्यात यावी. सदर सुचनापत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत निर्गमित करण्यात येऊन सदर सुचनापत्रासोबत बैठकीची कार्यसुची सादर करण्यात येईल, तथापि आकस्मिकरित्या एखाद्या सदस्यास सुचनापत्र निर्गमित करण्यात न आल्यास बैठकीमध्ये घेण्यात आलेला निर्णय अग्राह्य ठरविण्यात येणार नाही. तातडीच्या प्रसंगी किमान ०७ कामांच्या दिवसांपूर्वी सुचनापत्र निर्गमित करून अध्यक्षांना नियामक मंडळाची बैठक बोलविता येईल. ०६ महिन्यांच्या कालावधीत किमान एक बैठक आयोजित करण्यात येईल. तथापि नियामक मंडळ किंवा अध्यक्ष सोसायटीची उत्तम कार्यशिलता अथवा सुधारणेच्या कारणास्तव अधिक बैठका घ्यावयासाठी इच्छूक असल्यास त्याबाबत सर्व संबंधितांना कळवून तशी अनुमती त्यांना असेल.

५. नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये अध्यक्ष हे अधिकारपीठ सांभाळतील तसेच अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष हे अधिकारपीठ सांभाळतील व तसे न

झाल्यास नियामक मंडळ उपस्थित सदस्यांपैकी एक सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करेल.

६. नियामक मंडळाच्या सदस्यांची भरलेल्या पदांपैकी एक तृतीयांश अथवा किमान तीन यापैकी जे जास्त असेल ते नियामक मंडळाच्या प्रत्येक बैठकीस गणपूर्ती (Quorum) करेल.

७. नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये सर्व विवादग्रस्त प्रश्ने बहुमताने निर्धारित करण्यात येतील. नियामक मंडळाच्या प्रत्येक सदस्यास एकदा मत देता येईल व समान मते प्राप्त झाल्यास अध्यक्षांना निर्णायक मताचा अधिकार राहील.

८. नियामक मंडळाचे कोणतेही सदस्य नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये कोणताही ठराव मांडण्यास इच्छुक असल्यास, सदर सदस्य बैठकीच्या दिनांकाच्या १० कामांचे दिवसांपूर्वी व तातडीच्या बैठकीच्या संदर्भात किमान ०७ कामांचे दिवसांपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी सुचना देतील.

९. नियामक मंडळाच्या वार्षिक बैठकीपूर्वी एखाद्या विषयी निर्णय घेणे आवश्यक झाल्यास सदर बाब सर्व सदस्यांना प्रसृत (Circulation) करता येईल व याप्रमाणे नियामक मंडळाच्या किमान दोन तृतीयांश सदस्यांनी अशा निर्णयास संमती दिल्याचे अभिलिखित असल्यास व सदस्यांच्या सहीने बहुमताने मान्य झालेले असे कोणतेही प्रसृत निर्णय (Circulated Resolution), नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे प्रभावी व बंधनकारक राहतील.

१०. तातडीच्या परिस्थितीत एखाद्या विषयी सोसायटीचे अध्यक्षांना नियामक मंडळाच्या वतीने निर्णय घेता येईल व अशा प्रकारे घेतलेला निर्णय नियामक मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये अनुसमर्थनाकरीता सादर करण्यात येईल.

११. बैठक संपन्न झाल्यानंतर इतिवृत्ताची प्रत सर्व सदस्यांना शक्य तेवढ्या लवकर उपलब्ध करून देण्यात येईल.

२.**शक्ती :-**

१) नियामक मंडळाचे सोसायटीच्या कामकाजावर संपूर्ण नियंत्रण असेल व सोसायटीचे ध्येय व उद्दीष्टांशी सुसंगत असलेले सोसायटीचे सर्व अधिकार, नियम व विनियम आणि विलेख यांचा वापर व पालन करण्याचे प्राधिकार नियामक मंडळास राहतील.

२) विशेषत: आणि पूर्वगामी तरतूदीच्या सर्वसाधारणत्वाविरूद्ध पूर्वग्रह न करता, नियामक मंडळ:

- राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ आणि किंवा सोसायटी नोंदणी/ अधिनियम १८६० आणि किंवा/राकावि महामंडळाचे निर्देशांमधील तरतुदींचे पालन करण्याच्या अधीन राहून सोसायटीच्या कारभाराच्या प्रशासन व व्यवस्थापनाशी संबंधित कोणतेही उपविधी निश्चित, सुधारित व रद्दबातल करणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी सादर केलेले वार्षिक अर्थसंकल्प व वार्षिक कृती आराखडा व त्यानुषंगाने पुढील बदल विचारात घेणे व त्यानुसार नियामक मंडळास मान्य असलेले बदल मान्य करणे.
- निधी सुलभतेने उपलब्ध व्हावा याकरीता सोसायटीची वित्तीय बाबींचे संनियंत्रण करणे व वार्षिक लेखापरिक्षित लेखांचा आढावा घेणे.
- देणग्या व दान निधी स्वीकारणे किंवा नियामक मंडळाच्या मान्यतेने निधी स्वीकारणे.
- योग्य वाटेल त्याप्रमाणे सोसायटीचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांना शक्ती प्रत्यायुक्त करणे (Delegation of Powers).
- योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा बाबींकरीता व अशा शर्तीवर, समित्या व उपसमित्या नियुक्त करणे आणि त्यापैकी कोणत्याही विघटीत/रद्दबातल करणे.
- आयुक्तालय राज्य कामगार विमा योजना यांच्या अधिपत्याखालील विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, मंत्रालयीन, सुश्रुषा, समवैद्यकीय

आणि कार्यरत इतर संवर्गातील कर्मचारी यांचा समावेश असलेला कर्मचारीवृंदाचे सोसायटीचे कार्यांचे पालन करण्यास उपयोजन करणे.

- वस्तुसामुग्री व सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी राकावि महामंडळ/राज्य शासनाचे खरेदी कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक तत्वे अवलंबविणे.
- राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ आणि नियम व विनियम मधील तरतूदींशी संमत असलेले सोसायटीचे उद्दिष्टे पार पाडण्यास Memorandum of Association मधील Clause ३ येथे समावेश केलेली कार्ये सोसायटी पार पाडेल.
- राज्य शासनाच्या विनिर्देशांच्या अधिन राहून योग्य वाटेल त्याप्रमाणे सोसायटीचे कामकाज पार पाडण्यासाठी अशा करारांची सोसायटीच्या वतीने अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणे.
- सोसायटीच्या उद्दिष्टांशी विसंगत राहील किंवा या ठिकाणी उपलब्ध करण्यात आलेल्या तरतूदी, नियामक मंडळास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती आणि प्राधिकाऱ्यांना प्रतिकूल ठरतील अशा कृती किंवा उपविधी मान्य करण्याकरीता नियामक मंडळास प्राधिकृत करण्यास येथे समावेश करण्यात आलेल्या बाबी कारणीभूत ठरणार नाही याच्या अधिन राहून सोसायटीचे उद्दिष्टे पार पाडावयास आवश्यक व अनुषांगिक अशा सर्व कृती व कार्यवाही सर्वसाधारणपणे पार पाडणे.

## <u>परिशिष्ट “ब” : कार्यकारी समितीची कार्ये</u>

## <u>कार्यकारी समितीचे कार्ये (Functions of Executive Committee)</u>

१) नियामक मंडळाच्या वतीने कृती आणि विलेख करेल अशा कार्यकारी समितीचे गठन नियामक मंडळ करेल. दैनंदिन निर्णयांचे पालन आणि नियामक मंडळाने मान्य केलेला आराखडा आणि योजनांची अंमलबजावणी करण्यास सदर कार्यकारी समिती निर्णय घेईल व शक्तींचे वापर करेल. सदर कार्यकारी समिती वार्षिक अर्थसंकल्प, वार्षिक कृती

आराखडा आणि वार्षिक अहवाल तयार करेल आणि नियामक मंडळास मान्यतेसाठी सादर करेल.

२) कार्यकारी समिती वेळोवेळी अतितिक्त सदस्यांना स्वीकृत करेल आणि/किंवा विषयातील तज्ज्ञांना बैठकीस निमंत्रित करेल.

३) कार्यकारी समितीचे अशासकीय सदस्याचे पदावधी ०२ वर्षाचा राहील. कार्यकारी सदस्याचा पदावधी हा त्याचा नियामक मंडळातील पदावधी इतका राहील.

४) कार्यकारी समितीची बैठक ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत किमान ०७ कामांच्या दिवसांपूर्वी लेखी सुचना देऊन बोलविण्यात येईल. सदर सुचनेसोबत कार्यसुची तसेच बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण या बाबी कळविण्यात येतील. कार्यकारी समितीचे अध्यक्ष कमी कालावधीची सुचना देऊन बैठक घेऊ शकतील.

५) कार्यकारी समितीची बैठक ०३ महिन्यात किमान एकदा किंवा आवश्यकता असल्यास अधिक वारंवार घेण्यात येईल.

६) कार्यकारी समितीच्या सदस्यांच्या भरलेल्या पदांपैकी एक तृतीयांश अथवा किमान तीन यापैकी जे जास्त असेल ते कार्यकारी समितीच्या प्रत्येक बैठकीस गणपूर्ती (Quorum) करेल.

७) कार्यकारी समितीच्या बैठकींचे इतिवृत्ते नियामक मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात येतील.

८) नियामक मंडळाने गठीत केलेल्या विभिन्न समित्या, नियामक मंडळाच्या मान्यतेने अशा समित्यांनी केलेल्या शिफारशींवर निर्णय घेण्यास शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कार्यकारी समितीस अहवाल सादर करेल.

९) सचिवालयाच्या कामांचे नियोजन व अंमलबजावणी करणे, सचिवालयाच्या तांत्रिक/ व्यवस्थापकीय घटकांच्या कामांचे पर्यवेक्षण करणे, तसेच सचिवालयामार्फत निर्देशन व कार्यान्वयन चे संनियंत्रण करणे.